संशोधन आराखडा

‘भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे उस्मानाबाद जिल्ह्यातील कार्य: एक चिकित्सक अभ्यास (१९४८ ते २०००)’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील ‘इतिहास’ विषयातील पीएचडी पदवी मिळवण्यासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र (एम.ए., सेट.)

सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग,

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त) जि.सोलापूर

ई-मेल-kallyawatane@gmail.com. मोबाईल नंबर:९८६०११६१७६

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. ओमशिवा लिगाडे(एम.ए.,एम.फिल,पी.एच.डी.)

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,

शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव ता.चाकूर जि.लातूर.

ई-मेल- omshivaligade@gmail.com. मोबाईल नंबर: ९७६४०४६६४०

मार्च - २०२२

प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासात डाव्या पक्षांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शेतकरी कामगार पक्ष हा एक महत्त्वाचा राजकीय पक्ष आहे. भारतीय शेतकरी कामगार पक्षाने स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या पक्षाची स्थापना जरी १९४८ सली झालेली असली तरी त्याचा मूळ पाया स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक चळवळीमध्ये शोधता येतो. महाराष्ट्रातील स्वातंत्र्याच्या चळवळीत ब्राह्मणेतर समाजातील नेत्यांच्या विशेषता: देशभक्त केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांच्या हाकेला प्रतिसाद देऊण मोठ्या संख्येने कष्टकरी समाज सहभागी झाला. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतीअग्रणी जे.डी. लाड नागनाथअण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारच्या लढ्याने इंग्रजांना सोळोकी पळो करुन सोडले होते. देशभक्त तुळशीराम जाधव यांनी प्राण पणाला लावून स्वातंत्र्यसंग्रामात तळागाळातील जनतेला सामिल करून घेतले. सशस्त्र हल्ल्याची उभारणी केली. अशा हजारो बहुजन कष्टकरी समाजाच्या नेत्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात महाराष्ट्रातील जनतेला लाखोच्या संख्येने सामील करण्यात यश मिळवले.

ब्रिटिशसाम्राज्यशाहीचा अंत झाला की, देशाला स्वातंत्र्य मिळेल. मिळालेल्या स्वातंत्र्यात ब्राह्मणेत्तार बहुजन कष्टकरी समाजाला त्यांचे राजकीय अधिकार प्राप्त होतील. त्यांच्या उन्नतीचे व प्रगतीची संधी मिळेल. या विश्वासाने स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेण्याची प्रेरणा त्यांना मिळाली होती. स्वातंत्र्य मिळणार! स्वराज्य येणार! असा आशावाद हे नेते बाळगून होते.

स्वातंत्र्यचळवळीत अतुलनीय कामगिरी करणाऱ्या क्रांतिकारकांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडात जे स्वप्न पाहिले होते ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या आसपाससत्ता संक्रमणाच्या काळातभंगपावले. जीकाँग्रेस शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या राज्याची आश्वासन देत होती. ती आता भांडवलशाही धर्जिणी भूमिका घेत आहे. हे लक्षात येताच काँग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामगार यांच्या राज्यनिर्मितीसाठी 'शेतकरी कामगार पक्ष' स्थापन केला. या पक्षाने स्वातंत्र्योत्तर काळातही प्रस्थापित सरकार विरोधात गोरगरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी अखंड संघर्ष केला.

एवढेच नव्हे तर शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक नेत्यांपैकी अनेकजण हा पक्ष सोडून गेले. अशावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाने पक्षाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन महाराष्ट्रात या पक्षाचा विस्तार केला व प्रमुख विरोधी पक्षाची भूमिका पार पाडली. उस्मानाबाद जिल्हयातील राजकारण, समाजकारण करून सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सुखी व्हावे या तळमळीने शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाने कार्य केले. या सर्व बाबींचा आजपर्यंत अभ्यास झालेला नाही. तो होणे गरजेचे वाटते आणि तोच दृष्टिकोन पुढे ठेवून प्रस्तुत विषय अभ्यासासाठी निवडण्यात आलेला आहे.

- विषयाची निवड:

  महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनामध्ये एक महत्त्वाचा डाव्या विचारसरणीचा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्ष हा सन १९४८ पासून आजही कार्यरत आहे. या कालखंडामध्ये या पक्षाला राज्याची सत्ता मिळवता आली नाही. मात्र एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणून या पक्षाने निश्चितपणे एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. एखाद्या राजकीय पक्षाचा अभ्यास करताना त्या पक्षाची तात्त्विक अधिष्ठान घेवून झालेली स्थापना, दृष्टिकोण, पक्षाच्या स्थापनेमध्ये असलेल्या व्यक्ती व त्यांचे योगदान, पक्षाने लढवलेल्या निवडणुका व त्याला आलेले यशापयश या प्रमुख घटनांचा जसा अभ्यास केला जातो. तसाच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक योगदानाचा ही अभ्यास होणे महत्त्वाचे ठरते. शेतकरी कामगार पक्षाने आपल्या ध्येयधोरणानुसार जे कार्य केले त्यांचा लेखाजोखा मांडणे गरजेचे होते. परंतु त्यांच्याकडे अभ्यासकांनी फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. मात्र या पक्षाच्या यशापयशा बद्दल राज्यशास्त्र विद्याशास्त्रांमध्ये अनेक संशोधकांनी काम केल्याचे दिसून आले. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचा डावा पक्ष म्हणून कार्य करणाऱ्या या पक्षाच्या उस्मानाबाद जिल्हयातील कार्याच्या वस्तुनिष्ठ मांडणी करणे गरजेचे आहे. याची जाणीव मला सातत्याने होऊ लागली. स्वातंत्र्यप्राप्ती आणि स्वातंत्र्योत्तर सत्तास्थाने नजरेसमोर दिसत असतानाच काँग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामगार पक्षाचा जन्म झाला. उस्मानाबाद जिल्हा हा हैद्राबाद संस्थानात होता. हैद्राबाद संस्थानावर निजामाची राजवट होती. या संस्थानात

सामाजिक व राजकीय जागृती झालेली नव्हती तेव्हा सामाजिक व राजकीय जागृतीच्या उद्देश केशवराव कोलटकर यांनी हैद्राबाद येथे इ.स. १९१५ मध्ये 'सोशल सर्विस लीग' या संस्थेची स्थापना केली. तसेच एक मार्च १९१५ मध्ये शैक्षणिक परिषदेची स्थापना झाली. त्यामुळे लोक जागृती होऊ लागली. तेव्हा निजाम सरकारने इ.स.१९२० पासून सामाजिक व राजकीय जीवनावर निर्बंध लादण्यासाठी अनेक जुलमी कायदे पास केले. याचा परिणाम म्हणजे हैद्राबाद संस्थानात राजकीय चळवळीला गती मिळाली. २१ जून १९३८ मध्ये 'हैद्राबाद स्टेट काँग्रेसची'स्थापनाझाली.हैद्राबाद स्टेट काँग्रेसमध्ये मराठवाड्यातील प्रमुख नेतेगोविंदभाई श्रॉफ स्वामी रामानंद तीर्थ, आनंद भालेराव इत्यादी नेत्यांचा समावेश होता.इ.स. सन १९४६ मध्ये हैद्राबाद ला स्टेट कॉग्रेसचे अधिवेशन भरले तेथे दोन गट पडले. तेव्हा नरसिंगराव देशमुख यांच्या गटाने स्टेट काँग्रेस अंतर्गत 'काँग्रेस शेतकरी पक्षाची' स्थापना केली इ.स.१९४८ मध्ये स्टेट काँग्रेसच्या अधिवेशनात काँग्रेस अंतर्गत काँग्रेस शेतकरी संघाची गरज काय असा प्रश्न निर्माण केला व काँग्रेस शेतकरी संघ विसर्जित करण्याची मागणी केली. तेव्हा स्टेट काँग्रेस मध्ये राहून आपले कार्य पूर्ण होणार नाही अशी भावना उस्मानाबाद जिल्ह्यातील नर्सिंगराव देशमुख व इतर नेत्यांमध्ये निर्माण झाली. परिणामी त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मराठवाड्याच्या बाहेर इ.स.१९४७ ला देवाची आळंदी येथे शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. पुढे मराठवाड्यातील नरसिंग देशमुख, भाई उद्धवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे व इतर नेत्यांनी 'शेतकरी कामगार पक्षात' प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे मराठवाड्यात विशेषता उस्मानाबाद जिल्ह्यात इ.स. १९४९-५० साली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. उस्मानाबाद जिल्ह्यातील नेत्यांनी बहुजनवादी राजकारण करून उस्मानाबाद जिल्ह्यातच नव्हे तर आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ही आपला कर्तुत्वाचा ठसा उमटवला आहे.अशा या कार्याचे संशोधन होणे गरजेचे आहे. असे वाटू लागले उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्याची वस्तुनिष्ठ दृष्टीने मांडणी करणे गरजेचे आहे. याची जाणीव मला सातत्याने होऊ लागली.

त्यादृष्टीने मी प्रयत्न सुरू केले व त्यातूनच मी ‘भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे उस्मानाबाद जिल्ह्यातील कार्य: एक चिकित्सक अभ्यास (१९४८ ते २०००)’सदर विषय अभ्यासाला असता मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून मोठ्या प्रमाणावर संशोधन उपलब्ध झाली. या साधनावर विविध अंगांनी प्रकाश टाकण्यासाठी सदर विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

- संशोधनाची उद्दिष्टे:

सदरचे संशोधन कार्य करीत असताना खालील उद्दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

१ शेतकरी कामगार पक्षाच्या उदयाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२ शेतकरी कामगार पक्षाची उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थापना व वैचारिक बैठकीचा अभ्यास करणे.

३ शेतकरी कामगार पक्षाने केलेल्या चळवळी आणि त्याचा अभ्यास करणे.

४ शेतकरी कामगार पक्षाला लाभलेल्या नेतृत्वाचा अभ्यास करणे.

५ शेतकरी कामगार पक्षाची उस्मानाबाद जिल्ह्यात झालेली पीछेहाट याच्या कारणांचा अभ्यास करणे.

६ उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे.

- संशोधनाची गृहीतके:

सदर संशोधन करत असताना खालील गृहितके ठरवण्यात आली होती.

१ उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने संयुक्त महाराष्ट्र चळवळ व सिमा लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

२ उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार जनतेच्या विविध प्रश्नांवर आंदोलन करून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

३ उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने शेतकरी व श्रमिकांच्या प्रश्नांना वाचा फोडली.

४ उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने जबाबदार सक्षम सत्ताधारी व प्रभावी विरोधकाची भूमिका पार पाडली.

५ उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये प्रभावी नेतृत्व दिले.

- संशोधन पद्धती:

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक संशोधन पद्धती व सर्वेक्षण पद्धती याचा वापर करण्यात आलेला आहे व अप्रकाशित व प्रकाशित प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने साधनांचे अंतर्गत व बहिर्गत परीक्षण करून त्या आधारे प्रकरणाची मांडणी करण्यात आली आहे. प्राथमिक साधनांमध्ये मुंबई-पुणे कोल्हापूर येथील पुराभिलेख घरातील संसाधनांचा वापर करण्यात आलेला आहे. सावित्रीबाई फुले ,पुणे, शाहू संशोधन केंद्र, कोल्हापूर, वालचंद कॉलेज सोलापूर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे ग्रंथालय, आर.पी.महाविद्यालय उस्मानाबाद यांचे ग्रंथालय तसेच समकालीन कागदपत्रे, वृत्तपत्रे, शेतकरी कामगार पक्षाची मासिके, साप्ताहिके, स्मरणिका, अहवाल, पक्षाच्या अधिवेशनातील ठराव, ध्वनिमुद्रित भाषणे, पक्षाच्या खासदार व आमदाराची लोकसभा व विधानसभेतील भाषणे, मुलाखती इत्यादी संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे त्याच प्रमाणे दैनिक सत्यवादी, पुढारी सकाळ ,लोकसत्ता, तरुण- भारत, लोकमत यांची कार्यालये तसेच अनेक संकेतस्थळाचा वापर प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.

- प्रकरण रचना:

प्रस्तुत संशोधन कार्य करीत असताना एकूण सहा प्रकरणांमध्ये संशोधन विषयाची विभागणी केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण दुसरे : शेतकरी कामगार पक्षाच्या उदयाची पार्श्वभूमी ववैचारिक बैठक.

प्रकरण तिसरे : शेतकरी कामगार पक्षाच्या चळवळी आणि लढे.

प्रकरण चौथी: उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाला लाभलेले नेतृत्व.

प्रकरण पाचवे : शेतकरी कामगार पक्षाची जिल्हास्तरावर झालेली पीछेहाट कार्यकारण मीमांसा.

प्रकरण सहावे :उपसंहार

- संदर्भसूची :

१ देसाई दा.ब.(प्रका.), भारतीय शेतकरी कामगार पक्ष (दाभाडी येथे भरलेल्या पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात मंजूर झालेला राजकीय प्रबंध), द्वितीय आवृत्ती, मुंबई, फेब्रुवारी,१९३९ .

२ कीर धनंजय, 'महात्मा ज्योतिराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९३८ .

३ मोरे शंकरराव 'भारतीय शेतकरी कामगार पक्ष आढावा व आराखडा' भाई बाबासाहेब देसाई (प्रका.), श्री मुरारी मुद्राणालय, कोल्हापूर,१९८८

४ डॉ.पाटील एन. डी., रामभाऊ पाटील (संचालक) भाई दाजीबा देसाई खंड1, भाई दाजिबा देसाई प्रतिष्ठान, ज्योती महाविद्यालय प्रकाशन,बेळगाव, प्रथमावृत्ती १९ मार्च २०१० .

५ भारतीय शेतकरी कामकरीसंघटना, १९४७.

६ भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय शेतकरी कामगार पक्ष जडण-घडण आणि वाटचाल (१९४८ ते १९६०), लोकवाड.मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती २० नोव्हेंबर २०१०

७ पंडितनलिनी,महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, मॉडर्न बुक डेपो, पुणे,१९७२.

८ डॉ.पोवार विलास, कॉ. संतराम पाटील, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, सप्टेंबर२०१२

९ पाटील एन. डी.,भाई दाजिबा देसाई :एक समर्पित जीवन गरुड शांताराम (संपा) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी, एप्रिल २०१०.

१० पाटीलटी .एस.,भाई एन. डी.पाटील, कार्य व कर्तुत्व, भाईप्रा.एन.डी पाटील, कार्यगौरव समितीद्वारा शेतकरी कामगार पक्ष कार्यालय, कोल्हापूर २००३.

११ सायनाकर विश्वास, एकनाथ पाटील (संपा) १९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा,प्रा.एन. डी. पाटील प्रतिष्ठान सांगली, प्रथमावृत्ती, १९ ऑक्टोंबर २०१८,

१२ सायनाकर विश्वास,प्रा.एन. डी.पाटील, व्यक्ती, जडणघडण व संघर्ष,बेडकिहाळकिशोर व पाटील सी.व्ही.(संपा) प्रा. एन डी पाटील व्यक्ती आणि कर्तुत्व, बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, २००५.

१३ सानेरविकिरण, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००९ .

१४ डॉ. चौसाळकर अशोक, ‘महाराष्ट्रातील मार्क्सवाद विचार’, भोळे भा.ल. ,किशोरबेडकिहाळ(संपा.), बदलता महाराष्ट्र, आंबेडकर सातारा, २००३ .

१५ डॉ. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ,लोकवाड.मयगृह,मुंबई .

१६ देवशंकरराव, दैव देते आणि कर्म नेते, सासवड आश्रम विश्वस्त मंडळ, पुणे. १९७६ .

१७ देवगिरी ज़य. र., राजकिय आठवणी, चित्रशाळा, पुणे १९६५

१८ वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा - पेरणाशिकवणव विपर्यासलोकवाड.मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती १९८४ .

१९ फडणीस , : शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण,अजब प्रकाशन ,कोल्हापूर,8 फेब्रुवारी १९७८

२० फडके य.दी.(संपा.) दिनकरराव जवळकर समग्र वाड.मय, श्री विद्या प्रकाशन ,पुणे, १९८०

२१ फडके य.दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास १९३० – ४० खंड चौथा, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,१ जुलै १९९३ .

२२ फडके य.दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड तिसरा, १९२१-२९ के. सागर पब्लिकेशन, पुणे दुसरी आवृत्ती,१ मे २००८ .

२३ फडकेय.दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंडसहावा, १९४८-१९६० मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, दि, १८ जून २००७ .

२४ फडके य.दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड सातवा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४८ ते जानेवारी १९५६ , मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती १८ जून २००७

२५ फडके य.दी.विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पाचवा, श्री विद्या प्रकाशन, पुण१९९७ .

२६ फडके य.दी.विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड आठवा, श्री विद्या प्रकाशन, पुणे ,१८ जून २००७ .

२७ फडके य.दी. महाराष्ट्रातील पक्षपक्षाचे राजकारण, भा.श. भणगे (संपा.)

२८ फुले ज्योतिराव,‘गुलामगिरी’, कीर धनंजय,(संपा.), महात्मा फुले समग्र वाड.मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६९ .

२९ तुळशीदास जाधव यांचे शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र प्रांतिक कार्यकारणीच्या बैठकीत पुण्यात केलेले दि-२५ व २६ सप्टेंबर १९५४ चे निवेदन.

३० नाईकनवरे विश्वास,‘तिरपी टोपीताठमान’,(कै.शंकरराव मोरे यांचे विचार विश्व) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७ .

३१ शेवाळ वि.म.,माधवचव्हाण,गुलाबदेशमुख(संपा.) मी दत्तूचा दत्ता झालोत्याची गोष्ट कॉ.दत्ता देशमुख,कॉ.दत्ता देशमुख पुरोगामी विचारमंच,कोल्हापूर,प्रथमावृत्ती
३ नोव्हेंबर १९९६
३२ भोळे भा.ल.बेडकिहाळकिशोर,(संपा.) बदलता महाराष्ट्र, आंबेडकर अकादमी, सातारा, १६ जुलै २००३ .
३३ बोकील नीता,'महाराष्ट्राचा राजकीय इतिहास'(१९६० ते १९७२) मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती,१ मे २०१२ .
३४ वैद्य प्रभाकर: महात्मा फुले आणि त्यांची परंपरा,लोकवाड.मयगृह,मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८२ .
३५ शेवाळे विठ्ठल म. व इतर (संपा.) कॉ. दत्ता देशमुख -जीवन आणि कार्य, दत्ता देशमुख गौरव ग्रंथ,कॉ.दत्ता देशमुख अमृत महोत्सव समिती कोल्हापूर, प्रथमावृत्ती,५ सप्टेंबर १९९३ .
३६ पाटील शहाजी: उद्धवराव पाटील विविधअंगी राजकीय नेतृत्व,अप्रकाशित संशोधन ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, नोव्हेंबर, १९८८
३७ धोंडगे केशव शंकर:हैद्राबाद मुक्ती लढ्यातील मन्याड खोरी विजय कारगिल शौर्यगाथा,श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी कंधार जानेवारी २००१ .
३८ स्वामी रामानंद तीर्थ , हैद्राबाद मुक्तिसंग्राम संग्रामाच्या आठवणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६ .
३९ भालेराव अनंत:हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००१

४० भाई उद्धवराव पाटील विशेषक: (संपा.) सुरेश पाटील ,सुरेश तापडिया, एम.डी .देशमुख , ४ मार्च १९८९ .

४१ मासिके,त्रेमासिके, साप्ताहिके.

४२ वृत्तपत्रे.

४३ गौरवअंक,स्मरणिका, संकेतस्थळे.

४४ महाराष्ट्र विधानसभा डिबेटस.

दिनांक :

स्थळ :

संशोधक विद्यार्थी

प्रा.वटाणे कल्याण राजेंद्र

सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,

पंढरपूर (स्वायत्त) जि. सोलापूर.

संशोधन मार्गदर्शक

डॉ.ओमशिवा लिगाडे

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख

शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय नळेगाव

ता. चाकूर जि. लातूर.